मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कोणाच्या पोटात कशाला दुखायला पाहिजे!

## मी येणाऱ्या निवडणुकीत उमेदवार आहे : खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीत मावळमधून महायुतीकडून माझ्या उमेदवारीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या बैठकीत शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे महायुतीचा उमेदवार मीच असून माझा विजय देखील निश्चित असल्याचा विश्वास खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला. भाजपाच्या या दोन नेत्यांशिवाय निर्णय घेणारा अजून कोणी आहे असे मला वाटत नाही म्हणत बाळा भेगडे यांना टोला लगवितानाच नरेंद्र मोदींच्या करिष्म्यावर सुनील शेळके यांचा विश्वास नाही का? असा सवालही केला.




शिंदे यांच्या शिवसेनेच्या खासदार असलेल्या बारणे यांच्या मतदारसंघावर महायुतीतील मित्र पक्ष भाजप आणि अजित पवार गटाकडून दावा केला जात आहे. त्याला उत्तर देताना खासदार बारणे म्हणाले, महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघातील विजयी उमेदवारांपैकी माझी आघाडी निर्णायक असेल. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीला सामोरे जाताना काय काम केले हे जनतेला सांगेल. कोणीतरी राजकीय द्वेषातून, सुडापोटी मला काय काम केले असे विचारत असेल तर त्यांना उत्तर द्यायला बांधील नाही. माझी बांधिलकी मतदारांशी आहे. आमदार सुनील शेळके यांचे व माझे राजकीय किंवा वैयक्तिक कसलेच मतभेद नाही. पण त्यांनी माझ्यावर आरोप का केले, कोणी त्यांना बोलायला लावतंय का? हे बघावं लागेल. भाजपचे देशातील नेते अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेचे जे खासदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत आहेत, त्या जागा त्यांनाच देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कोण काय बोलते, याला महत्व नाही. भाजपाच्या या दोन नेत्यांशिवाय निर्णय घेणारा अजून कोणी आहे असे मला वाटत नाही. राष्ट्रवादीला त्यांची ताकद वाढली आहे असे वाटत असेल तर त्यांनी खुशाल मागणी करावी. मागील काळात मी राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा दोन लाख मतांनी पराभव केला आहे. आजमितीला माझ्यासमोर कोणीही इच्छुक नाही. मी येणाऱ्या निवडणुकीत उमेदवार आहे असे म्हटलो तर कोणाच्या पोटात कशाला दुखायला पाहिजे. मी मोदी लाटेवर निवडून आलो हे आमदार शेळके म्हणत असतील. तर, त्यांचा किंवा अजित पवार यांचा नरेंद्र मोदींच्या करिष्म्यावर विश्वास नाही का? तुम्ही कोणत्या विचारांनी महायुतीत आलात याचेही उत्तर द्यावे, असेही खासदार बारणे म्हणाले.

### काय काम केले हे जनतेला सांगेल

**» शिंदे यांच्या शिवसेनेच्या खासदार असलेल्या बारणे यांच्या मतदारसंघावर महायुतीतील मित्र पक्ष भाजप आणि अजित पवार गटाकडून दावा केला जात आहे. त्याला उत्तर देताना खासदार बारणे म्हणाले, महाराष्ट्रातील ४८ लोकसभा मतदारसंघातील विजयी उमेदवारांपैकी माझी आघाडी निर्णायक असेल. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीला सामोरे जाताना काय काम केले हे जनतेला सांगेल. कोणीतरी राजकीय द्वेषातून, सुडापोटी मला काय काम केले असे विचारत असेल तर त्यांना उत्तर द्यायला बांधील नाही. माझी बांधिलकी मतदारांशी आहे. आमदार सुनील शेळके यांचे व माझे राजकीय किंवा वैयक्तिक कसलेच मतभेद नाही. पण त्यांनी माझ्यावर आरोप का केले, कोणी त्यांना बोलायला लावतंय का? हे बघावं लागेल.**

# तीर्थक्षेत्र देहू ग्रामस्थांचे गायरानासाठी आमरण उपोषण

## संदीप वाघेरे यांचा जाहीर पाठिंबा

**मोशी न्यूज एक्सप्रेस मराठी।** तीर्थक्षेत्र देहू हे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांची जन्म व कर्मभूमी परंपरेनुसार तुकाराम बीज सोहळा व आषाढी पायी वारी पालखी सोहळा तसेच वसंत पंचमी हा संत तुकाराम महाराजांचा जन्मदिवस तसेच कार्तिकी वारीस जगभरातून लाखो वारकरी व भाविक भक्त श्री क्षेत्र देहू मध्ये येत असतात. देहूच्या दीडशे एकर गायरानापैकी पन्नास एकर



गायरान हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयाला देण्याच्या हालचाली सरकारकडून सुरू आहेत. संत तुकाराम महाराज संस्थान व देहू ग्रामस्थांच्या वतीने या प्रस्तावाला विरोध करण्यात आला असून गायरान वाचवण्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. सदर आमरण उपोषणास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्यावतीने प्रत्यक्ष भेट देऊन जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. सदरील गायरान देहूमध्ये होणाऱ्या विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उपलब्ध करून देण्यात यावे तसेच सदरील जागेमध्ये विविध प्रकल्प उभारण्यात यावे यासाठी आम्ही जाहीर पाठिंबा देत आहोत असे वाघेरे यांनी सांगितले.

यावेळी संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, नगराध्यक्षा पूजाताई दिवटे, ह.भ. प. संजय महाराज मोरे विश्वस्त संत तुकाराम महाराज संस्थान, नगरसेवक योगेश परंडवाल, माजी नगराध्यक्ष स्मिताताई चव्हाण, नगरसेवक प्रवीण काळोखे, जनजागृती मंचचे अध्यक्ष प्रकाश काळोखे, युवा नेते प्रशांत काळोखे, माजी उपसरपंच स्वप्निल काळोखे, माजी उपसरपंच प्रकाश हगवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शरद पवार गटाचे शक्ती प्रदर्शन!

## पिंपरी-चिंचवड हा अजित पवारांचा एकेकाळचा बालेकिल्ला

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड हा अजित पवारांचा एकेकाळचा बालेकिल्ला आहे. याच बालेकिल्ल्यात आता शरद पवार गट मोठ्या ताकदीने राजकीय रिंगणात उतरला आहे. उद्या (शनिवारी) शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते शरद पवार गटाच्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. या निमित्ताने शरद पवार गट पिंपरी-चिंचवडमध्ये शक्ती प्रदर्शन करणार असल्याची चर्चा सुरू आहे. या उद्घाटनाला जयंत पाटील यांच्यासह जितेंद्र आव्हाड आणि राजेश टोपे हेदेखील उपस्थित असणार आहेत. आम्ही शक्तिप्रदर्शन करत नाहीत. पिंपरी- चिंचवड शहरामध्ये शरद पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पिंपरी- चिंचवड शहर हे शरद पवारांचं आहे. शरद पवार यांच्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक उत्स्फूर्त प्रतिसाद देतील असा विश्वास शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी व्यक्त केला आहे. पिंपरी-चिंचवड शहर हे अजित पवारांचा बालेकिल्ला म्हणून नेहमीच ओळखला जातो. या ठिकाणचा विकास अजित पवार यांनीच केल्याचं त्यांचे कार्यकर्ते रोखठोकपणे सांगतात. परंतु, याच बालेकिल्ल्याला आता सुरुंग लावण्यासाठी शरद पवार गट सज्ज झाला आहे. उद्या शनिवारी पिंपरीतील शरद पवार गटाच्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर ते कार्यकर्त्यांना संबोधित करतील, यावेळी त्यांच्यासोबत जितेंद्र आव्हाड आणि राजेश टोपे हे देखील असतील. नेमकं सध्याच्या महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीवर जयंत पाटील काय भाष्य करतात याकडे देखील अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे. नुकतंच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दोन दिवसीय शिबीर कर्जत येथे पार पडले. अजित पवार यांनी अप्रत्यक्षपणे शरद पवार यांच्यासह शरद पवार गटाच्या नेत्यांवर निशाणा साधला आहे. त्याचबरोबर बारामती लोकसभेवर दावा ठोकला आहे. त्यामुळे यावर देखील ते काही बोलतात का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. तूर्तास तरी पिंपरी-चिंचवड शहर हा अजित पवारांचा बालेकिल्ला खेचून आणण्यासाठी शरद पवार गट कामाला लागल्याचं बघायला मिळत आहे.




# मराठी भाषेत पाट्या न लावणाऱ्या दुकानांवर कडक कारवाई करा

## मराठी भाषेत पाट्या न लावल्यास तीव्र आंदोलन

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड मनसेने मराठी पाट्या न लावलेल्या दुकानांवर कारवाई करण्याची मागणी पिंपरी चिंचवड पोलिसांकडे पत्राद्वारे केली आहे. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी त्यांच्या इतर पदाधिकाऱ्यांसह पिंपरी-चिंचवड पोलिसांना पत्र दिले. सर्व दुकाने, हॉटेल व इतर आस्थापना यांनी दुकानावर मराठी भाषेत पाट्या लावणे बंधनकारक असून त्या पाट्या लावण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने सर्वांना २ महिन्यांची मुदत दिली होती. ती मुदत २५ नोव्हेंबर २०२३ रोजी संपलेली आहे. यापूर्वी मराठी भाषेत पाट्या लावण्याविरोधात काही व्यापारी संघटनांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. परंतु, सुप्रीम कोर्टाने त्यांची याचिका फेटाळून लावली व दोन महिन्यांत सर्व दुकानांवर ठळकपणे मराठी भाषेत पाट्या लावण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते, असे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी म्हटले. पुढे ते म्हणाले, आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील अनेक दुकानांवर आजही मराठी भाषेत पाट्या लावलेल्या दिसून येत नाहीत. शहरातील सर्व दुकाने, हॉटेल, आस्थापनांना सुप्रीम कोर्टाचे आदेश पाळणे अपेक्षित असताना बऱ्याच ठिकाणी त्याची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. तरी निवेदनाद्वारे विनंती करण्यात येत आहे की सुप्रीम कोर्टाच्या निर्देशांप्रमाणे आपल्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व दुकाने, हॉटेल, आस्थापना यांना त्वरित मराठी भाषेत पाट्या लावण्याबाबतचे निर्देश देऊन सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्यास सांगावे. पुढे ते म्हणाले, २५ नोव्हेंबर २०२३ नंतर ज्या दुकानांवर, हॉटेलवर, आस्थापनांवर मराठी भाषेत पाट्या लावलेल्या दिसणार नाहीत तर त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मराठी भाषेत पाट्या लावण्यासंदर्भात पिंपरी चिंचवड शहरात तीव्र आंदोलन केले जाईल. त्यावेळी जर काही तणावग्रस्त परिस्थिती उद्भवली तर त्यास केवळ आपण जबाबदार असाल याची आपण गंभीर नोंद घ्यावी. (मुंबई महानगरपालिकेने २५ नोव्हेंबर २०२३ नंतर मराठी भाषेत पाट्या लावल्या नसतील तर त्या दुकानांना कोणतीही नोटीस न देता थेट कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.) आपण वरील विषयाचे गांभीर्य ओळखून योग्य ती कार्यवाही कराल व पुढील होणारे आंदोलन टाळाल, अशी अपेक्षा मनसेने बाळगली आहे. पिंपरी चिंचवड मनसेने मराठी पाट्या न लावलेल्या दुकानांवर कारवाई करण्याची मागणी पिंपरी चिंचवड पोलिसांकडे पत्राद्वारे केली आहे. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी त्यांच्या इतर पदाधिकाऱ्यांसह पिंपरी-चिंचवड पोलिसांना पत्र दिले. सर्व दुकाने, हॉटेल व इतर आस्थापना यांनी दुकानावर मराठी भाषेत पाट्या लावणे बंधनकारक असून त्या पाट्या लावण्यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने सर्वांना २ महिन्यांची मुदत दिली होती. ती मुदत २५ नोव्हेंबर २०२३ रोजी संपलेली आहे.



### कोर्टाचे पालन करण्यास सांगावे

**» आपल्या पिंपरी चिंचवड शहरातील अनेक दुकानांवर आजही मराठी भाषेत पाट्या लावलेल्या दिसून येत नाहीत. शहरातील सर्व दुकाने, हॉटेल, आस्थापनांना सुप्रीम कोर्टाचे आदेश पाळणे अपेक्षित असताना बऱ्याच ठिकाणी त्याची अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. तरी निवेदनाद्वारे विनंती करण्यात येत आहे की सुप्रीम कोर्टाच्या निर्देशांप्रमाणे आपल्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व दुकाने, हॉटेल, आस्थापना यांना त्वरित मराठी भाषेत पाट्या लावण्याबाबतचे निर्देश देऊन सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्यास सांगावे.**

# ‘स्मार्ट सिटी’चा स्मार्ट कारभार?

## पुण्यातील हवेच्या गुणवत्तेची माहिती हवीय : मग पैसे द्या!

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**



शहरातील हवेची गुणवत्ता वेगवेगळ्या ठिकाणी किती आहे, याचा शोध घेण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून ४५ ठिकाणी हवा गुणवत्ता निर्देशांक सेन्सर (एअर क्वालिटी इंडेक्स सेन्सर) बसविण्यात आले असले तरी त्यातील माहिती स्मार्ट सिटीकडून गोपनीय ठेवण्यात आल्याची वस्तुस्थिती पुढे आली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांकाची माहिती महापालिकेलाही देता येणार नाही. ती केवळ एका खासगी संस्थेला दिली जाते. माहिती हवी असल्यास पैसे मोजून ती खाजगी कंपनीकडून घ्यावी, असे स्मार्ट सिटीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील वाढत्या वायू प्रदूषणाबाबत चिंता व्यक्त केली जात असताना माहिती अहवाल गोपनीय ठेवण्यात आल्याने स्मार्ट सिटीच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील हवेची गुणवत्ता वेगवेगळ्या ठिकाणी किती आहे, याचा शोध घेण्यासाठी स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत हवा गुणवत्ता निर्देशांक सेन्सर बसविण्यात आले. त्यासाठी नागरिकांच्या करातून जमा झालेले कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले. शहरातील वायू प्रदूषण वाढत असून वैकुंठ स्मशानभूमी परिसरात मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर येथे दोन हवा गुणवत्ता निर्देशांक सेन्सर बसविण्यात आले आहेत. शहरातील सर्व हवा गुणवत्ता निर्देशांक सेन्सरमधून संकलित केलेली माहिती सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी माहिती अधिकार दिनात महापालिकेकडे मागितली होती. त्यांना दिलेल्या माहितीतून ही धक्कादायक बाब पुढे आली आहे. स्मार्ट सिटीकडून कोणतीही माहिती महापालिकेला दिली जात नाही, असे महापालिकेकडून वेलणकर यांना सांगण्यात आले. महापालिका अधिकाऱ्यांनी स्मार्ट सिटी मिशनच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून वेलणकर यांना माहिती देण्यास सांगितले. मात्र महापालिकेसह अन्य कोणालाही माहिती देता येणार नाही. संकलित माहिती एका खाजगी संस्थेला दिली जाते आणि ती हवी असेल तर खाजगी संस्थेकडे पैसे भरावे लागतील, असे अजब उत्तर स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी दिले. नागरिकांच्या करातून कोट्यवधी रुपये खर्च करून यंत्रणा बसविण्यात आली असताना माहिती गोपनीय का ठेवली जाते, असा प्रश्न यानिमित्ताने वेलणकर यांनी उपस्थित केला. शहरातील वाढत्या हवा प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर माहिती महापालिका, वाहतूक पोलीस आणि नागरिकांना उपलब्ध झाली तर वायू प्रदूषणावर ठोस उपाययोजना करता येणे शक्य आहे. त्यामुळे संकलित माहितीचा अहवाल स्मार्ट सिटी तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे, असे वेलणकर यांनी सांगितले. तसे निवेदन त्यांनी स्मार्ट सिटी प्रशासनाला दिले आहे.

### माहिती गोपनीय का ठेवली जाते

» स्मार्ट सिटीकडून कोणतीही माहिती महापालिकेला दिली जात नाही, असे महापालिकेकडून वेलणकर यांना सांगण्यात आले. महापालिका अधिकाऱ्यांनी स्मार्ट सिटी मिशनच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी करून वेलणकर यांना माहिती देण्यास सांगितले. मात्र महापालिकेसह अन्य कोणालाही माहिती देता येणार नाही. संकलित माहिती एका खाजगी संस्थेला दिली जाते आणि ती हवी असेल तर खाजगी संस्थेकडे पैसे भरावे लागतील, असे अजब उत्तर स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी दिले. नागरिकांच्या करातून कोट्यवधी रुपये खर्च करून यंत्रणा बसविण्यात आली असताना माहिती गोपनीय का ठेवली जाते, असा प्रश्न यानिमित्ताने वेलणकर यांनी उपस्थित केला.

# मुलांना मांसाहारी बनवण्याचं शासनाचं षड्यंत्र

## शालेय पोषण आहारात अंडी नकोत : डॉ. कल्याण गंगवाल

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**



महाराष्ट्र सरकारने ७ नोव्हेंबर २०२३ रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करत शाळेतील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारात उकडलेली अंडी, अंडा भुर्जी, अंडा बिर्याणी, केळी देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. हा शासन निर्णय ५ डिसेंबर २०२३ पासून लागू केला जाणार आहे. शास्त्रीयदृष्ट्या मांसाहार आरोग्यास हानिकारक असून, शालेय पोषण आहारात अंडी दिली जाऊ नयेत, अशी मागणी शाकाहार चळवळीचे पुरस्कर्ते डॉ. कल्याण गंगवाल यांनी पत्रकार परिषदेत केली. शाळांमधून जेवणात अंडी देणे अयोग्य आहे. शाळेतील जैन, महानुभव पंथी, ब्राह्मण व अन्य शाकाहारी विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होईल. इतर विद्यार्थी अंड्यांचे पदार्थ खाताना त्यांनाही ते पदार्थ खाण्याची इच्छा होईल.वय लहान असल्याने त्यांना या गोष्टींचे ज्ञान नसते. त्यातून ही सवय जडली जाईल. एक प्रकारे या जैन आणि शाकाहारी मुलांना मांसाहारी बनविण्याचे महाराष्ट्र शासनाने षडयंत्र असून, ही अतिशय गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की,अंडी उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळण्यासाठी ही योजना चालू केली आहे.परंतु शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विद्यार्थ्यांना मांसाहारी बनविणे कितपत योग्य आहे.याचा विचार आपण केला पाहिजे. आपला धर्म वाचविण्यासाठी सर्व लोकांनी एकत्र येऊन सरकारच्या निर्णयाविरोधात तीव्र सामाजिक लढा देणे गरजेचे आहे.अंडे मांसाहारी असून, अंड्यातून कुठलेही पोषक घटक मिळत नाहीत. अंड्यात ‘सी’ व्हिटॅमिन नाही. प्रोटिन्सही केवळ १३.५ टक्के इतकेच आहे.त्यामध्ये कोलेस्ट्रॉल मोठ्या प्रमाणात असते.पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांवर अँटिबायोटिक्स, हार्मोन्सचा मोठा मारा होतो. शिवाय अंड्यांची उत्पत्ती अधिक व्हावी, याकरिता अनैसर्गिक प्रक्रिया केली जाते. अंडी शिळी की ताजी, याचीही आपल्याला माहिती नसते. त्यामुळे त्यातून अनेक रोगांना निमंत्रण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की,अंड्याच्या सेवनामुळे सालमोनेला (टायफॉईडचा ताप), ऍलर्जी, सर्दी, दमा, त्वचारोग, फूड पॉइजनिंग, पचन प्रक्रियेत बिघाड आदी आजार बळावतात. अनेक घातक अंश शरीरात येत असल्याने हृदयविकार होण्याची शक्यता अधिक असते. अंडी शाकाहारी नाहीत.अफलित अंड्यातील जिवंत स्त्रीबीजाला आपण मारतो. अशा हिंसक आहारामुळे मानसिक आरोग्यही बिघडते. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी आपण का खेळतोय, याचा विचार शाळा व पालकांनी करायला हवा,असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# पक्ष हातातून गेला तर पुन्हा तयारी करणार

## जे ज्याच्या हक्काचे आहे ते त्याच्याकडे राहिले पाहिजे : खा. सुप्रिया सुळे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

जे ज्याच्या हक्काचे आहे ते त्याच्याकडे राहिले पाहिजे, ही माझी भूमिका आहे; परंतु आता पक्ष कोणाचा यावरून न्यायालय आणि आयोगापुढे कामकाज सुरू आहे. पक्ष हातातून गेला तरी आम्ही पुन्हा तयारी करू,' असे मत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केले. बारामती तालुक्याच्या गावभेट दौर्यात त्या पत्रकारांशी बोलत होत्या. खा. सुळे म्हणाल्या, 'राष्ट्रवादीची स्थापना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. ते स्थापनेपासून अध्यक्ष आहेत. आजवर अध्यक्षपदावरून त्यांना कधीही हटवले गेलेले नाही. त्यामुळे पक्षाबाबत आता कोणी दावा करत असेल तर तो कितपत योग्य आहे? माझ्याकडे सत्ता किंवा संघर्ष असे दोन पर्याय होते. मी संघर्षाचा पर्याय निवडला. 'कॅबिनेटमध्ये मंत्री एकमेकांशी चर्चाच करत नाहीत. सत्तेतील दोन मंत्री माध्यमांतून एकमेकांवर टीका करतात. याचा अर्थ कॅबिनेटमध्ये त्यांचे बोलणे होत नाही. पण, या सगळ्यात सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना एकत्र बसवावे. अधिवेशन बोलावत मार्ग काढावा,' असे मत त्यांनी व्यक्त केले. 'राज्यातील दुष्काळी स्थितीसाठी केंद्राकडे केवळ २ हजार ६०० कोटींची मागणी केली आहे. एवढ्या रकमेतून कशी मदत करणार?' असा सवाल खा. सुळे यांनी केला. 'दुसरीकडे मंत्रालयाच्या बिल्डिंगसाठी ७ हजार कोटींची तरतूद केली जात आहे. मंत्रालयाची बिल्डिंग चांगली असताना दुसरी बांधण्याचे



काही कारण नाही. या पैशातून दुधाला अनुदान, सरसकट कर्जमाफी, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न सुटू शकतील.' 'बारामतीत सहकारी संस्थांवर वर्चस्वासाठी प्रयत्न करणार का?' या प्रश्नावर त्या म्हणाल्या, 'हळूहळू बदल होईल. पण मी राजकारणात सेवेसाठी आले आहे. वर्चस्वासाठी नाही. धोरणात्मक कामात मला रस आहे. शरद पवार यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत धोरणात्मक कामावरच भर दिला.' 'बारामती ही माझी कर्मभूमी, जन्मभूमी आहे. मी वर्ध्यातून लोकसभा निवडणूक लढवणार, असे बोलले जात आहे. पुण्यानंतर मला वर्धा प्रिय आहे. मी वर्षातून दोनदा तेथे जाते. सेवाग्राम व पवनार आश्रमाला भेट देते. माझ्यावर महात्मा गांधी व विनोबा भावे यांचा प्रभाव आहे; परंतु तेथून निवडणूक लढविण्याचा विषय नाही,' असेही खा. सुळे यांनी स्पष्ट केले. 'शेतक-यांचे कंबरडे मोडण्याचे पाप ट्रिपल इंजिन खोके सरकार करते आहे,' अशी टीका करून खासदार सुळे म्हणाल्या, 'राज्यात एकीकडे दुष्काळ आहे, दुसरीकडे अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे शरद पवार कृषिमंत्री असताना जशी सरसकट कर्जमाफी मिळाली होती, तशी या सरकारने देण्याची गरज आहे. छोट्या-छोट्या कामांसाठी, पालकमंत्री बदलण्यासाठी मंत्री खासगी विमानाने दिल्ली वार्या करीत आहेत. त्यांनी एखादी वारी सरसकट कर्जमाफीसाठीही करावी.

### सामान्य माणूस भरडला जात आहे

» 'कॅबिनेटमध्ये मंत्री एकमेकांशी चर्चाच करत नाहीत. सत्तेतील दोन मंत्री माध्यमांतून एकमेकांवर टीका करतात. याचा अर्थ कॅबिनेटमध्ये त्यांचे बोलणे होत नाही. पण, या सगळ्यात सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना एकत्र बसवावे. अधिवेशन बोलावत मार्ग काढावा,' असे मत त्यांनी व्यक्त केले. 'राज्यातील दुष्काळी स्थितीसाठी केंद्राकडे केवळ २ हजार ६०० कोटींची मागणी केली आहे. एवढ्या रकमेतून कशी मदत करणार?' असा सवाल खा. सुळे यांनी केला. 'दुसरीकडे मंत्रालयाच्या बिल्डिंगसाठी ७ हजार कोटींची तरतूद केली जात आहे. मंत्रालयाची बिल्डिंग चांगली असताना दुसरी बांधण्याचे काही कारण नाही. या पैशातून दुधाला अनुदान, सरसकट कर्जमाफी, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न सुटू शकतील.'

# वारकरी संप्रदायाकडून देहू बंदची हाक!

## दोन दिवसांनी महाराष्ट्रही बंद करणार

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज देवस्थानचे विश्वस्त ग्रामस्थांसह आमरण उपोषणाला बसलेत. चौथा दिवस उजाडला तरी सरकारने या उपोषणाकडे डोकावून ही पाहिलं नाही. म्हणूनच देहूकर आता आक्रमक झालेले आहेत. उद्या देवस्थान आणि ग्रामस्थांनी देहू बंदची हाक दिली आहे. परवा देहूतील मार्ग चहुबाजूंनी बंद केली जाणार आहेत. त्यानंतर ही सरकार जागं झालं नाही तर वारकरी संप्रदाय महाराष्ट्र बंद ठेवण्याच्या तयारीत आहे. सरकार



देहूतील ५० एकर गायरान जागा पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाला देण्याचा घाट घातला आहे. ही जागा वारकरी सांप्रदायासाठी आणि गावच्या विकासासाठी द्यावी. अशी मागणी मान्य होत नसल्यानं देहूतील मंदिरासमोर आमरण उपोषण सुरु आहे. तरी ही सरकारला कीव येईना म्हणूनच उद्या देहू बंदची तर पुढे महाराष्ट्र बंद करण्याची तयारी वारकरी सांप्रदयाने केलेली आहे. या बंद नंतरही जर सरकारने आमच्याकडे लक्ष दिलं नाही तर आम्ही राज्यातलं प्रत्येक गाव बंद करु असा इशारा वारकऱ्यांकडून देण्यात आला आहे. राज्यभरातून आम्ही पाठिंबा मागणार आहोत. आयुक्तालयाता दिलेली जागा देहूत आलेल्या वारकऱ्यांसाठी, किर्तनासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. या जागेत विठुनामाचा गजर होईल, मात्र सरकारने या जागेवर आयुक्तालयाला देण्याचा घाट घातला आहे.त्याला विरोध करण्यासाठी ४ दिवसांपासून उपोषण करत आहोत. सरकारने आमच्याकडे लक्ष द्यावं नाहीतर महाराष्ट्र बंदची हाक देऊ, असा इशारा वारकऱ्यांनी दिला आहे. काही दिवसांपूर्वी श्री क्षेत्र देहूची गायरान जमीन पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयास देण्यास आज श्री संत तुकाराम महाराज संस्थान विश्वस्त आणि देहूतील नगरसेवकांनी रस्त्यावर उतरून विरोध केला होता. ग्रामस्थांनीही सहभाग घेतला होता. 'देहू बंद'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. गायरान हे नगरपंचायत इमारत आणि राज्यभरातून येणाऱ्या भाविकांच्या दृष्टीने रुग्णालय व निवास व्यवस्था यासाठी लागणार आहे.